# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

वर्ष ४३ अंक ९

वृत्त 2.0 || मराठी तितुका मेळवावा ||

On the Web www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

सप्टेंबर २०२३ नि. श्रावण/भाद्रपद शके १९४५


## अध्यक्षीय




प्रिय मित्र-मैत्रिणींनो,

चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सर्व प्रथम आपले यान उतरविण्याच्या पराक्रमी आणि विजयी कामगिरीबद्दल इस्रोच्या सर्व शास्त्रज्ञांचे मनःपूर्वक अभिनंदन. देशाबाहेरील प्रत्येक मराठी वसाहतीमध्ये, प्रत्येक घराघरात, प्रत्येक व्यक्तीला याचा खूप आनंद आणि अभिमान आहे.

या आनंदात भर म्हणजे महेश काळे स्कूल ऑफ म्युझिक यांच्याबरोबर, संयुक्त संयोजनाने, बृहन्महाराष्ट्र मंडळ शास्त्रीय संगीत शिक्षण उपक्रम सुरू करत आहे. उपक्रम लहानांपासून-मोठ्यांपर्यंत सर्वांना उपलब्ध आहे. मला स्वतःला असे वाटते की आपल्या मराठी शाळेतील मुलांनी याचा फायदा घ्यावा. bmm2.org/music-signup

सविता मोरे, आणि युवा सायली नातू आणि अमृता पेडणेकर यांच्या नेतृत्वाखाली युवा प्रकल्प उत्तुंग भरारी घेत आहे. यावर्षी आयोजित केलेल्या इंटर्नशिप प्रकल्पात एकूण १०० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सगळ्या मार्गदर्शक, आयोजक आणि विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन. या विद्यार्थ्यांना कॉलेज शिक्षणासाठी प्रत्येकी $३०० tuition असिस्टन्स देण्यात येणार आहे. पुढल्या वर्षी या प्रकल्पात ५०० विद्यार्थ्यांना सामावून घेण्याची माझी इच्छा आहे. bmm2.org/yuwa-signup
२०२२-२४ मधली आपली सगळी मिळकत आपण युवा शैक्षणिक निधीमध्ये भरणार आहोत.

आपल्या दुसऱ्या पिढीतील युवा समीर मुजुमदार यांच्या नेतृत्वाखाली बृहन्महाराष्ट्र मंडळ चेस क्लब सुरू झाला. या क्लब मध्ये आता शंभरहून अधिक सभासद सामील झालेले आहेत. bmm2.org/chess-signup

मंजुषा नाईक हिच्या नेतृत्वाखाली १२ ऑगस्टला सिॲटल येथे बृहन्महाराष्ट्र मंडळ मॅट्रीमोनीयल (रेशीमगाठी) ची दुसरी in-person मीट यशस्वीरित्या पार पडली. तिचे व तिच्या सर्व सहकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

अभी घोलप, अरुंधती दात्ये, प्राजक्ता वझे व टीम यांच्या प्रयत्नांनी बृहन्महाराष्ट्र मंडळ मूव्ही क्लबची सभासद संख्या आता पाचशेच्या वर गेलेली आहे. शॉर्ट फिल्म निर्मितीसाठी उत्तर अमेरिकेतून लघुकथा मागवण्यात आल्या - त्याला पन्नासहून अधिक लेखकांनी प्रतिसाद दिला. यातील दोन लघुकथा शॉर्ट फिल्मसाठी निवडण्यात आल्या. या शॉर्ट फिल्मच्या निर्मितीसाठी आठ निर्माते तयार आहेत. दिग्दर्शन वर्कशॉप मध्ये पंधराहून अधिक उत्सुकांनी भाग घेतला. या सर्वांना शॉर्ट फिल्म दिग्दर्शन सहाय्यासाठी आम्ही संधी उपलब्ध करून देणार आहोत. bmmfilmclub.com

प्रशांत दामले यांचे “एका लग्नाची पुढची गोष्ट” आणि संकर्षण कराडे यांचे “नियम व अटी लागू” ह्या दोन्ही नाटकांचे दौरे आपण सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये उत्तर अमेरिकेत आयोजित केलेले आहेत. प्रशांत दामले हे दौरे बीएमएम शैक्षणिक निधी उभारणीसाठी करत आहेत. त्यांचे मनःपूर्वक आभार.


सॅन होजे येथे जून २७-३०, २०२४ मध्ये होणाऱ्या “काय बे” अधिवेशनाची मंडळांद्वारे ३५% हून अधिक तिकीट विक्री झालेली आहे. क्लिव्हलँडहून निघालेली “काय बे” मशाल वाजत गाजत सर्व मंडळात थांबत सॅन होजे येथे पोहोचणार आहे.

या अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजे जून २७ ला बीएमएम २.० मेळावा आयोजित करत आहोत, ज्यामध्ये मराठी शाळा राष्ट्रीय स्पर्धा परिषद, उत्तररंग परिषद, बीकनेक्ट परिषद, आणि आंतरराष्ट्रीय मराठी मंडळ परिषद अशा चार परिषदा भरणार आहेत. त्याचप्रमाणे रेड कार्पेट आणि पहिला बीएमएम २.० फिल्म फेस्टिवल देखील आयोजित करत आहोत ज्यामध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळ निर्मित दोन शॉर्ट फिल्म्स दाखवण्यात येतील! bmm2.org/melawa

आपल्या मंडळामध्ये संपर्क साधून तिकीटे किंवा डोनेशन पॅकेजेस लवकरात लवकर घ्या! आता सांख्यकारिकेतील एका श्लोकाने थांबतो:

भेदानाम् परिमाणात शक्तीतः प्रवृत्तेच। कारण कार्य विभागात अविभागात वैश्व रुपस्य ॥
(जसे उदा. लोणी हे - दूध, वेळ व प्रक्रिया - याने बनते. तसेच) हे विश्व - मुळ तत्व, वेळ आणि प्रक्रिया याने बनलेले आहे. मुळ तत्व आणि विश्व ही एकाच गोष्टीची दोन (cause आणि effect) रुपे आहेत.

शुभेच्छा,




संदीप दीक्षित

*अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ २०२२-२४ / President, Bruhan Maharashtra Mandal (BMM) 2022-24*

+1 216-926-6696
sandeep.dixit@bmmonline.org
twitter.com/sandeepsdixit
www.bmmonline.org
bmm2.org/app

#bmm2 #bmm2024 #communityCentricBMM #mandalMember #vruttaSubscriber

## बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै . विष्णु वैद्य, कै . शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर

अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
BMM Treasurer - Rajan S Pednekar
20611 Whitebud CT. Tampa FL 33647
Ph- 813-546-1330
Email: Rajan.Pednekar@bmmonline.org

**वर्गणीचे दर**:- $25/ year
Subscription payment is accepted online by Paypal:
https://www.bmmonline.org/vrutta/subscription

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $175 अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70 अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२२ - २०२४)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | |
|---|---|
| अध्यक्ष: | संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो |
| सचिव: | अजित नातू, सॅक्रामेंटो, कॅलिफोर्निया |
| कोषाध्यक्ष: | राजन पेडणेकर, टॅम्पा बे, फ्लोरिडा |
| सदस्य: | अमर उन्हेकर, लिविंगस्टन, न्यु जर्सी |
| | सविता मोरे, वॉशिंग्टन |
| | मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा |
| | प्रसाद पानवळकर ऑस्टिन, टेक्सस |
| | विराज राऊत, सॅन होजे, कॅलिफोर्निया |

**नियुक्त सदस्य**

| | |
|---|---|
| माजी अध्यक्ष: | विद्या जोशी, शिकागो, इलिनॉय |

**विश्वस्त समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्ष : | मोहित चिटणीस, सिऍटल, वॉशिंग्टन |
| सदस्य: | नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय |
| सदस्य: | सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट |
| प्रकाशक: | बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका |

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक मंडळ | २ |
| बृ. म. मंडळ २०२४ अधिवेशन - अहवाल | ३ |
| वारसा | ४ |
| जाहिरात | ५ |
| BMM Film Club, पॉडकास्ट | ६ |
| लेख : नात्यांचा सोहोळा | ७ |
| कविता: श्रावण - एक निसर्ग क्षण | ८ |
| कविता: भिजलेले क्षण, जाहिरात | ९ |
| दिवाळी अंक २०२३ आवाहन | १० |
| जाहिरात | ११ |

## संपादक समिती

वृत्त संपादनाची धुरा नवीन संपादक मंडळाने हाती घेतली आहे. नवीन संपादक मंडळाची घडी बसेपर्यंत वृत्तच्या अंकात काही बदल दिसतील. तुमच्या सूचना ईमेलद्वारे जरूर कळवा.

**संपादक समिती**

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
राजन पेडणेकर

## वृत्त २०२३ दिवाळी अंक

वृत्ताच्या दिवाळी २०२३ अंकासाठी (नोव्हेंबर आणि डिसेंबरचा एकत्रित अंक) साहित्य (लेख, कथा, कविता, प्रवासवर्णन, पाकक्रिया, व्यंगचित्रे इ.) पाठवण्याचे उत्तर अमेरिकेतील आणि भारतातील देखील मराठी लेखकांना आम्ही आवाहन करीत आहोत. आवाहन अधिक माहिती हया अंकाच्या पान नंबर १० वर उपलब्ध आहे.

Email your entries to: *vrutta@bmmonline.org* before **Sept 15th**. Please add '*Diwali Ank*' in the email subject.

## बृहन महाराष्ट्र मंडळाच्या २०२४ सालच्या अधिवेशनाचा अहवाल

## BMM 2024 च्या अधिवेशनात निघणाऱ्या स्मरणिकेविषयी: बाल विभाग फ्लायर




BMM 2024 च्या अधिवेशनात निघणाऱ्या स्मरणिकेत बाल विभाग देखील असणार आहे. तुमच्या 6 ते 14 वयाच्या मुलांकरता छान छान विषय घेऊन आलो आहोत.

पण आधी https://bmm2024.org/smaranika/ या वेबसाईट वर मजेशीर व्हिडियो पहा.

## yo yo Yuva! वी वॉन्ट YOU !




BMM 2024 च्या अधिवेशनात निघणाऱ्या स्मरणिकेत युवा शुड ऑल्सो पार्टीसिपेट ना ! मिंग्लिश (मराठी+ इंग्लिश) चालेल बरं!

पण आधी पहा: https://bmm2024.org/smaranika/ या वेबसाईट वरील रॅप्स आणि व्हिडीओज.

## BMM 2024 गायन स्पर्धा:




सर्व मराठी प्रेमी रसिकांना कळविण्यास अतिशय आनंद होतोय की, आपल्या दीर्घ प्रतीक्षेनंतर बीएमएम २०२४ चे अधिवेशन हे बे एरिया - कॅलीफोर्निया येथे संपन्न होत आहे. उत्तर अमेरिकेतील सर्व प्रतिभावान कलावंतांना आपली गानकला सादर करण्याची संधी या अधिवेशनाच्या निमित्ताने मिळणार आहे. या संधीचा फायदा घेऊन सर्व मराठी रसिकांच्या मनाला हे कलावंत नक्कीच भुरळ घालतील याची आम्हाला खात्री आहे.

कलाकारांनी आपल्या गाण्याचा व्हिडिओ तयार करून १५ ऑक्टॉबर, २०२३ पर्यंत आम्हाला खालील दुव्यावर पाठवावा. या स्पर्धेत सुगम संगीत आणि शास्त्रीय संगीत हे दोनच गान-प्रकार स्वीकारले जातील. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी किमान वयोमर्यादा ९ वर्षे आहे. ९ ते १८ वर्षे या वयोगटातील स्पर्धकांनी ६ मिनिटांचा व्हिडिओ पाठवावा आणि १८ वर्षांपुढील स्पर्धकांनी १० मिनिटांचा व्हिडिओ करून पाठवावा.

**संकेतस्थळ:**
https://bmm2024.org/north-america-vocal-competition/
**ई-मेल:** nacompetitions@bmm2024.org

# बृहन्महाराष्ट्र मंडळाचा नवीन प्रकल्प "वारसा", Youtube मालिका


आजचा उत्तर अमेरिकेतील मराठी समाज कोण आहे हे समजून घ्यायचे असेल तर आपण कुठून आलो, का आलो, आणि इथल्या मातीत आपली मूळ रोवून कसे भरभराटीला आलो हे शोधलं पाहिजे, त्याची नोंद करून ते जतन केलं पाहिजे. अश्या गोष्टी एकत्रित केल्या कि सर्वांना आणि भावी पिढीला आपल्या प्रवासाची झलक मिळेल. त्यासाठी चालू केला आहे "वारसा" हा प्रकल्प.

वारसा मालिका, भाग आठवा

"मन तळ्यात मळ्यात”

बडोदा ते अमेरिका ते मुंबई ते अमेरिका ते मुबई आणि परत अमेरिका

बळवंत आणि लता कार्लेकर, अमेरिकेत स्थलांतर १९५८



श्री. बळवंत कार्लेकर १९५८ मध्ये बडोदा University मधून Engineer झाले आणि अचानक भारतीय सरकारने त्यांची उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाण्यासाठी निवड केली. घरच्या गरिबीमुळे आपण परदेशात कधी जाऊ अशी स्वप्नही न पाहणाऱ्या बळवंतनी University Of Illinois मधून MS आणि PhD केली आणि भारत सरकारच्या अटी नुसार भारतात परत गेले. तिथे लता भोळे बरोबर लग्न करून संसार उभारला. पण अमेरिकेचं आकर्षण मनात कुठेतरी हाका मारतच राहिलं आणि १९६५ मध्ये Rochester Institute Of Technology मध्ये शिकवण्याची संधी चालून आल्यावर लगेचच Rochester मध्ये स्थलांतर झाले. पण इतर अनेक अमेरिकेत वास्तव्य केलेल्या भारतीय लोकांसारखी भारताची विशेषत: आपल्या नातेवाईकांची आठवण, आई वडिलांची वाढती वय, अमेरिकेत मोठी होणारी आपली मुलं ह्या सर्वांमुळे मनात परत भारतात जावे असं वाटू लागलं आणि तसा निर्णय घेऊन अमेरिकेतलं सर्व विकून कार्लेकर कुटुंब मुंबईला कायम राहायच्या बेताने परतले. पण जेवढं वाटलं तेवढं हे स्थलांतर सोपं गेलं नाही आणि थोड्याशा नाराजीनेच कार्लेकर कुटुंब परत रॉचेस्टरला आले ते मात्र आता मागे पाहायचं नाही हे ठरवूनच. त्यांच्या ह्या तळ्यात मळ्यात झालेल्या आयुष्याच्या प्रवासाची कहाणी त्यांच्याकडूनच ऐकू या, ह्या आपल्या आठव्या सत्रात. ”मन तळ्यात मळ्यात, बडोदा ते अमेरिका ते मुंबई ते अमेरिका ते मुंबई आणि परत अमेरिका ”.

वारसा मालिकेचा हा अनोखा भाग (#8) “ मन तळ्यात मळ्यात" पहाण्यासाठी ही लिंक https://youtu.be/5Rdf5J1uEsM क्लिक करा. किंवा तुमच्या mobile phone वरून इथे दिलेला QR code scan करा. ह्या Youtube channel ला जरून like आणि subscribe करा.

Past Episodes: https://www.youtube.com/@bmm-varasa

## आगामी नाटके




BMM Educational Endowment Fundraising Tour

| | |
|---|---|
| Friday, Sep 8 | Seattle |
| Saturday, Sep 9 | New Jersey |
| Sunday, Sep 10 | Delaware |
| Monday, Sep 11 | Open |
| Friday, Sep 15 | Open |
| Saturday, Sep 16 | Bay Area |
| Sunday, Sep 17 | Kansas City |
| Monday, Sep 18 | Open |
| Friday, Sep 22 | DC |
| Saturday, Sep 23 | Cleveland |
| Sunday, Sep 24 | Chicago |
| Monday, Sep 25 | Open |
| Friday, Sep 29 | Open |
| Saturday, Sep 30 | Dallas |
| Sunday, Oct 1 | Raleigh |
| Monday, Oct 2 | Open |
| Friday, Oct 6 | Pittsburgh |
| Saturday, Oct 7 | Orlando |
| Sunday, Oct 8 | Tampa |




BMM Educational Endowment Fundraising Tour

| | |
|---|---|
| Friday, Sep 29 | Open |
| Saturday, Sep 30 | Chicago |
| Sunday, Oct 1 | St Louis |
| Monday, Oct 2 | Open |
| Friday, Oct 6 | Dallas |
| Saturday, Oct 7 | Raleigh |
| Sunday, Oct 8 | Bay Area |
| Monday, Oct 9 | Open |
| Friday, Oct 13 | Austin (Tentative) |
| Saturday, Oct 14 | Houston |
| Sunday, Oct 15 | South Florida |
| Monday, Oct 16 | Open |



ATHARV WINS
"TOP EMERGING DEVELOPER"
Mumbai Suburban
Atharv
Redefining Vile Parle
HOSTED BY
TIMES OF INDIA
Witness the visionary leaders of Atharv Lifestyle as they proudly receive the Top Emerging Developer award. Their expertise and unwavering commitment have propelled us to new heights in real estate. Experience the allure of our remarkable creations that blend contemporary design with timeless aesthetics.
+91 7738866111 | sale@atharvalifestyle.com

## BMM Film Club

'देऊळ' या माझ्या पहिल्या चित्रपटाला सुवर्णकमळ नॅशनल अवॉर्डने सन्मानित केल्यानंतर काही चित्रपट मी भारतात केले. त्याच वेळेला मनात एक कल्पना घोळत होती की मराठी चित्रपट सृष्टी नॉर्थ अमेरिकेत स्थापन करावी. काही महिन्यापूर्वी, बीएमएम चे अध्यक्ष श्री. संदीप दीक्षित यांच्याशी बोलताना या कल्पनेचा पुनरुच्चार केला आणि संदीपच्या मदतीने, बीएमएम फिल्म क्लबची स्थापना १० जून २०२३ ला केली. अल्पावधीतच ५०० हुन अधिक मेंबर्स मिळाले. वर्षाअखेरीस २ शॉर्ट फिल्म्सची निर्मिती करण्याचे ध्येय ठेवून फिल्म क्लबच्या तयारीला लागलो. अनेक गुणी कलावंत, दिग्दर्शक, नृत्य दिग्दर्शक, गायक, कवी, सिनेमॅटोग्राफेर्स, संकलक यांनी फिल्म क्लब मध्ये नोंदणी केली. बरेच मेंबर्स नाटक आणि स्टेज परफॉर्मन्स करत होते. त्यांच्यासाठी नॅशनल अवॉर्ड विनिंग दिग्दर्शक, उमेश विनायक कुलकर्णी यांचा फिल्म मेकिंग कार्यशाळा आयोजित केली. त्याच बरोबरीने अनुभवी व नावाजलेल्या फिल्म मेकर्स बरोबर संवाद स्थापण्यासाठी " टॉक शो " सिरीज ची सुरवात केली. यात, डॉ. मोहन आगाशे, दिलीप प्रभावळकर, उमेश कुलकर्णी, डॉ. सलील कुलकर्णी यांचे सेमिनार्स झाले.

२ शॉर्ट फिल्म्सच्या निर्मितीचे ध्येय सर्व सभासदां समोर मांडले. त्याला भरघोस प्रतिसाद मिळाला. चित्रपटाची पहिली गरज उत्तम कथा. ६५ हुन अधिक कथा आमच्या मेम्बर्सनी आम्हाला पाठवल्या. नॉर्थ अमेरिकेशी संदर्भ प्रस्थापित करण्याऱ्या गोष्टी आहेत या सगळ्या. त्यातून ५ कथा निवडण्यासाठी १४ मेंबर्सचे एक पॅनल स्थापले. त्याच बरोबर को-प्रोड्युसरचा शोध सुरु केला. आपल्याच मेंबर्स मधून १७ को-प्रोड्युसर्स पुढे आले. लवकरच २ कथा ठरवण्यात येतील आणि चित्रपट निर्मिती च्या प्रक्रियेला सुरवात होईल.

रविवारी ३० जून २०२४ रोजी नॉर्थ अमेरिकेतील पहिल्या मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन करीत आहोत. या दिवशी आपल्या सर्वांना नवीन चित्रपट त्यांच्या कलाकार आणि फिल्म मेकर्स बरोबर बघता येतील. आपल्यातल्या कुणाला बीएमएम फिल्म क्लब जॉईन करायचा असेल तर कृपया खालील लिंक चा वापर करावा.

( http://bmm2.page.link/film-club )

जास्तीत जास्त मराठी चित्रपट, शॉर्ट फिल्म्स, टीव्ही सिरिअल्स यांचे निर्मिती करणारी भूमी म्हणून आपण सर्व प्रयत्न करूयात. तुमची मोलाची साथ अपेक्षित धरतो. फिल्म क्लब ला उत्तम आधार देण्याऱ्या माझ्या सर्व टीमचे आभार. खास उल्लेख करावा असे - राजन पेडणेकर, सुजित तेलंग, अरुंधती दाते, प्राजक्ता वझे, अनिकेत ढवळे, सायली वैद्य!

धन्यवाद !




**- अभि घोलप**

## पॉडकास्ट 'श्यामची आई' नवा स्वाद नवा अनुभव

मंडळी, पाहता पाहता... अहं ....ऐकता ऐकता 'कथा BMM' पॉडकास्टचा पहिला उपक्रम यशस्वीरित्या सुफळ संपूर्ण झाला सुद्धा. हो ! सुफळ संपूर्णच म्हणायचा. त्याचे कारण .. नाही तर कारणे आहेत. तुम्ही म्हणाल पॉडकास्ट आम्ही ऐकले. काय तर! फक्त गोष्टी वाचायच्या तर होत्या. खरंय तुमचं. गोष्टी वाचायच्या आणि ऐकायच्या होत्या. आजकालच्या वेगवेगळ्या दृक-श्राव्य नव्या आयुधांमधून जेव्हा सगळे काही चालते- फिरते, रंगी-बेरंगी, मनमुक्त आणि सोयीस्कर असे उपलब्ध आहे; त्यातून आपल्या भाषेतल्या गोष्टी ऐकायला शालेय पिढीला आकर्षित करणे हे एक आव्हानच आहे.

श्यामची आई हे पॉडकास्ट गुढी पाडव्याच्या दिवशी म्हणजे २२ मार्च या दिवशी सुरू झाले. त्यासाठी तयारी मात्र बरीच आधी सुरू झाली. पॉडकास्ट साठी प्रमुख ३ गोष्टी लागतात. त्या म्हणजे गोष्टी/पुस्तक, वाचक आणि वाचलेली गोष्ट सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी तांत्रिक (technical) यंत्रणा.

पहिले पुस्तक आम्ही निवडले "श्यामची आई". गोष्ट निवडताना त्याच्या लेखकाची परवानगी, कॉपी राईट्स (मुद्रक हक्क) आणि आपली नॉन-प्रॉफिट या सगळ्यांचा विचार करताना कॉपी राइट मुक्त असलेले पुस्तक मिळवणे हा महत्वाचा भाग होता. साधना प्रकाशनाने परवानगी दिल्यामुळे पहिल्या उपक्रमासाठी तरी मार्ग मोकळा झाला.

श्यामची आई हे पुस्तक ८८ वर्षांपूर्वी लिहिले आहे. त्यातील भाषा, संदर्भ, जागेची/परिसराची वर्णने, त्या काळात असलेली

सामाजिक विचारसरणी, उपलब्ध साधने हे सगळे आताच्या बाल पिढीला आणि मुख्यत्वाने भारताबाहेर/महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्या मुलांसाठी समजणे कठीण होते. गोष्टीतल्या पात्रांना समजून घेण्यासाठी त्यांच्या परिचयाचे शब्द, त्याचे अर्थ समजावत त्या गोष्टी वाचणे आवश्यक होते. यासाठी प्रत्येक गोष्ट बारकाईने वाचत, गोष्टीच्या मूळ गाभ्याला धक्का न लागू देता प्रत्येक गोष्ट तयार करावी लागली. हे महत्वाचे आणि किचकट काम पॉडकास्ट च्या मंजूरी टीम मधे असलेल्या शर्मिष्ठा गाडगीळ, बकुल गोडबोले, वसुधा ताम्हणकर आणि मी (प्रगती नाडकर्णी) करत होतो. वाचक गोष्ट वाचून त्याची ऑडिओ प्रत पाठवत. त्यात उच्चार, शब्द, बोली, वाचनाचा वेग आणि गोष्टीची लांबी लक्षात ठेऊन, ह्या गोष्टी वाचणे हे कौशल्याचे काम होते. श्यामची आई पुस्तकातल्या ४२ रात्रींच्या कथा ४२ वाचकांनी उत्तम रीतीने वाचल्या. त्यांचे मनःपूर्वक आभार! यात एक गोष्ट सांगाविशी वाटते, ती म्हणजे - गोष्ट वाचणे आणि गोष्ट सांगणे यात खूप फरक आहे. श्राव्य माध्यमाचे आपलेसे वाटण्याचे गुपित यातच दडले आहे.

गोष्ट ऐकताना ती श्रवणीय आणि मनोरंजक करण्यासाठी, त्यातला भाव कळण्यासाठी योग्य असे पार्श्वसंगीत जोडीला असणे गरजेचे होते. मंडळी, हे संगीतही कॉपी राइट मुक्त असणे आवश्यक होते. ते शोधून प्रत्येक गोष्टीनुरूप जोडण्याचे काम प्रविण पिंगळे यांनी केले. ह्या गोष्टी तयार झाल्यानंतर सर्वात मोठे काम ते ठरलेल्या दिवशी श्रोत्यांपर्यन्त पोहोचवणे. हे म्हणजे कर्त्यानंतर, 'करवित्या' चे काम राहुल देशमुख आणि प्रवीण पिंगळे या जोडीने केले.

या गोष्टी करताना मजेशीर अनुभवातून आम्ही सगळे जात होतो. कधी काही शब्दांसाठी आधुनिक शब्द मिळत नसत तर कधी कोकणातल्या जागा (कथेची पार्श्वभूमी), वर्णने यासाठी काटछाट करताना त्रेधा उडत होती. काही गोष्टी खूपच लांब होत्या. त्या ठरलेल्या वेळेच्या साच्यात बसवणे क्लिष्ट होत होते. काही वाचक वाचलेल्या गोष्टी कमी करायला तयार नव्हते, कधी गोष्टीऐवजी नाट्यवाचनाचा सूर लागत होता तर कधी एखादी गोष्ट मुलांसाठी योग्य आहे की नाही, ह्या चर्चेत वेळ जात होता. एक ना अनेक! तरीही स्वयंसेवी होऊन आपला बहुमूल्य वेळ देत आपल्या भाषेसाठी, नव्या पिढीसाठी उचललेले आव्हान यशस्वी झाले.

आकडेवारीत सांगायचे झाले तर सरासरी १०० श्रोते ह्या गोष्टी दर आठवड्याला ऐकत होते. खरे सांगू? अगदी जे. के. रोलिंगचा आनंद आम्ही अनुभवला.

ही तर सुरुवात होती. 'श्यामची आई' नंतर लगेचच आषाढी एकादशीच्या सुमुहूर्तावर 'संतांच्या गोष्टी' हा दुसरा उपक्रम सुरू झाला आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे संतांच्या जीवनावरील पारंपारिक रोचक कथा ज्या खुद्द वाचकांनीच लिहिल्या आहेत. २४ कथांचे हा उपक्रम आपणही जरूर ऐका.

**पॉडकास्ट लिंक-**
https://podcasters.spotify.com/pod/show/kathabmm



डावीकडून उजवीकडे: सविता मोरे, राहुल देशमुख, बकुळ गोडबोले, प्रगती नाडकर्णी, प्रवीण पिंगळे, वसुधा ताम्हणकर, वैशाली महावीर, शर्मिष्ठा गाडगीळ

- **प्रगती नाडकर्णी**

## नात्यांचा सोहळा

नाती हा शब्द आला की आपल्या डोळ्यासमोर आपली माणसे यायला लागतात. आता आपली माणसं म्हणजे काय? ज्यांच्याशी आपले काही नाते असते, काही ऋणानुबंध असतो, ती अशी नाती आपल्या जन्माबरोबरच बांधलेली असतात. अश्या नात्यात, जेव्हा अजून नवीन नाती निर्माण होतात तेव्हा ती अजूनच दृढ होतात. आईशी आपलं नात सगळ्यात दृढ आणि अगदी जवळचे असते. त्यात आई जेव्हा मैत्रिण होते तेव्हा त्या नात्याला अजून नवीन छटा येते आणि ती फारच सुखावह असते.

बहिणी बहिणींची माया काही वेगळीच असते. जिच्या बरोबर हक्काने भांडू शकतो, वेळ प्रसंगी पाहिजे ते मागू शकतो. या विश्वासाच्या नात्यामध्ये मैत्री समानतेचा भाव आला की मग लहान बहिण पण तितक्याच हक्काने मोठ्या बहिणीची चूक दाखवून देऊ शकते, अधिकार-वाणिने बोलू शकते.

असेच बाकीच्या नात्यांचे पण आहे. मग ते मुलगी-वडील,

मुलगा-वडील, भाऊ-बहीण वा इतर. अश्या सगळ्याच नात्यांचा पाया विश्वासावर असतो. त्यात एकमेकांबद्दलचा आदर, मैत्रभाव असेल तर तीच नाती सोन्याची होऊन जातात. ही सगळीच नाती आपल्या जन्माबरोबरच येतात. मग ती आपल्याला आवडो वा न आवडो. पण मैत्री हे नाते असे असते की जे आपण आपल्या मनाने ठरवतो. ते कोणी आपल्यावर लादलेले नसते. ते आपले आपणच मान्य केलेले असते. मग ती होतात ऋणानुबंधाची नाती. ती रक्ताच्या नात्यापेक्षा काही वेळेला दृढ झालेली दिसतात, कारण त्यात काही अपेक्षा नसतात, काही देणे घेणे याचा हिशोब नसतो, म्हणूनच जीवाभावाची मैत्री हा वाक्प्रचार दृढ झाला. हा जीवभाव म्हणजेच त्या नात्यातील ओढ, जिव्हाळा, आपलेपणा, खरेपणा. त्या खरेपणामुळे त्या विश्वासामुळे हे मैत्र जीवांचे नाते अजून घट्ट होते.

याच अश्या मैत्रीच्या नात्याने सुदामा पूर्ण विश्वासाने कृष्णाला भेटायला गेला होता. जेव्हा एकमेकांचा सहवास आवडायला लागतो, एकमेकांचे विचार पटायला लागतात तेव्हाच हे मैत्रीचे नाते निर्माण होते, एक बंध निर्माण होतो. अश्या बंधाला कुठलेच बंधन नसते, कुठल्याच सीमा नसतात. विश्वबंधुत्त्वाची कल्पना यापेक्षा काय वेगळी आहे?

तसेच, जेव्हा आपण आपल्या सगेसंबंधी यांच्यापासून काही कारणासाठी दूर जातो तेव्हा कळत नकळत आपल्याला त्या नात्यांची उणीव भासू लागते. क्वचित गृहीत धरलेल्या गोष्टी, विनाकारण अडून बसलेल्या गोष्टी, त्यातली पोकळी जाणवून त्या नात्याची किंमत कळायला लागते. उणीवेची जाणीव होते आणि त्याच त्या नात्यांना एक वेगळीच धार येते. नवनवीन पैलू जडले जाऊन त्याचेच कोंदण होते.

आता ह्या सगळ्या मध्ये अजून एक मुद्दा डोळ्यासमोर येतो तो असा की नातं ते मग कोणतेही असो, ते आरश्यातल्या प्रतिबिंबासारखे पारदर्शक असायला पाहिजे. अशी ही नाती आणि असा हा नात्यांचा सोहळा.

नात्या नात्यांचा हा सोहळा लाख मोलाचा मेळावा
दिवसांगणीक मुरणारा वयांबरोबर वाढणारा
नात्यांतल्या नात्याने नात्यांचे रंग खुलवणारा
नात्याला पैलू पाडणारा
अशी ही नाती...तुमची नी आमची... साऱ्यांचीच.

**- उत्तरा भालेराव**

## श्रावण - एक निसर्ग क्षण

निसर्गाची लयलूट आणि मुक्त उधळण श्रावण महिन्यात चालू असते. निसर्ग सण साजरा करण्यासाठी नटलेला असताना, आपणही मंगळागौर, जिवतीपूजन, नागपंचमी, ऋषीपंचमी असे सण साजरे करून आपली संस्कृती जपत असतो ........

वळीव पावसाची रिमझिम घेऊन, आला श्रावण आला
व्रतवैकल्यांचा धूप-दीप उजळून, आला श्रावण आला

सूर्याच्या हळद-केशरी पाउलांनी,आला श्रावण आला
मंगळागौरीचा हिरवा साज सजवून, आला श्रावण आला

बकुळ, प्राजक्ताचा सडा घालून, आला श्रावण आला
जिवती-आईचे अतूट प्रेम घेऊन, आला श्रावण आला

सुस्नात मातीचा सुगंध घेऊन, आला श्रावण आला
नागपंचमी संस्कृती जपत, आला श्रावण आला

इंद्रधनूचा गोफ विणून, आला श्रावण आला
बंधू प्रेमाची राखी बांधून, आला श्रावण आला

ढगांच्या रुपेरी किनारीत लपून, आला श्रावण आला
ऋषी-मुनी तपस्वींची याद देऊन, आला श्रावण आला

निसर्गक्रमाचा खेळ रंगवून, गेला श्रावण गेला
'श्रींच्या' आगमनाची नांदी गाऊन, गेला श्रावण गेला

**- अंजली भिडे**

**राशिभविष्य: सप्टेंबर २०२३**
दादा दामले (न्यू जर्सी )
https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## भिजलेले क्षण

दगाबाज नशिबाच्या रेषांनी माझ्या आधी कसे बर नेले तुला
भिंतीवरच्या सावलीत चित्र  उमटले की भास तुझा होतो मला

बारीक बारीक तुझ्या हरकतींची अशी सवय झाली आहे मला
वाऱ्यानी दारावरचे तोरण सळसळले  की भास तुझा होतो मला

छपराकडे वारा कसा कुरवाळून घेऊन जातो उदबत्तीच्या धुराला
आजपण  त्या उदाचे सुगंध दरवळले  की भास तुझा होतो मला

पठारावर काळे खडक  कापत झरा सुसाट वाहत होता चालला
मग खळखळणारे आवाज ऐकू आले की भास तुझा होतो मला

दिवसा अखेर  रात्रीच्या वेळी  काळोख असतो  अंगणात पडलेला
एखादे  किरण कुशीत येऊन झोपले की भास तुझा होतो मला

दिवस भराचा प्रवास  करून सायंकाळी असतो भास्कर थकला
त्याची वाट पाहणारे क्षितिज पाहिले की भास तुझा होतो मला


माझ्या आयुष्याच्या सांजवेळी हा चित्रपट आहे जेमतेम संपला
नाट्यगृहातील पडदे पडताना दिसले  की भास तुझा होतो मला

\- **शशांक चिटणीस**












## वृत्त दिवाळी अंक २०२३ साठी आवाहन

नमस्कार मंडळी,

बीएमएम वृत्त तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकाला या वर्षी ४२ वर्षं पूर्ण होत आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे! बृ. म. मं. वृत्ताचा दिवाळी अंक - नोव्हेंबर आणि डिसेंबरच्या संयुक्त अंकासाठी आम्ही नॉर्थ अमेरिका स्थायिक तसेच, भारतातील देखील मराठी लेखक, कवी, चित्रकार, व्यंगचित्रकारांना अभिरुचीसंपन्न साहित्य व दर्जेदार कलाकृती पाठविण्याचे आवाहन करीत आहोत. या अंकाला वैविध्यपूर्ण बनविण्यासाठी आपले लेख, कविता, नर्म विनोद, चुटके, हास्यचित्रे, प्रवास वर्णन आणि चविष्ट पाककृती सुद्धा जरूर पाठवाव्यात.

**साहित्य पाठवण्याची अंतिम तारीख: सप्टेंबर १५,२०२३**

**अपेक्षित साहित्य व शब्दमर्यादा:**

* कथा, लेख, निबंध: १००० शब्द (फोटो रहित )

*कथा, लेख, निबंध: ६०० शब्द (फोटो सहित )

* चुटके: १५० शब्द

* पाककृती, संकीर्ण उपयुक्त माहिती: ३०० शब्द

* कविता: २० ओळ

*अंकासाठी स्वीकारलेल्या साहित्यापैकी उत्कृष्ट साहित्याला किंवा कलाकृतीला 'संपादकांची पसंती' हे पारितोषिक निवड समितीने केलेल्या निर्णयानुसार देण्यात येईल.*

**साहित्य पाठवण्याचे नियम -**

1. साहित्य आपले स्वत:चे असावे आणि इतरत्र प्रकाशित झालेले नसावे.
2. रुपांतरित किंवा अनुवादित साहित्यावर मूळ लेखकाच्या नावासह तसा उल्लेख असणे आवश्यक आहे.
3. साहित्याच्या निवडीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. निवडलेल्या साहित्यात मोजकेपणा, सुस्पष्टपणा आणि शुध्दलेखन यांच्या दृष्टीने आवश्यक ते बदल करण्याचा हक्क संपादकांना राहील.
4. प्रिंटरच्या तांत्रिक चुकींसाठी संपादक मंडळ वा प्रकाशक जबाबदार राहणार नाही.
5. लेखकांनी साहित्याबरोबरच स्वत:चा संपूर्ण पत्ता, फोन नंबर आणि ई-पत्ता (email address) पाठवणे आवश्यक आहे.
6. निवड न झालेले साहित्य परत पाठवले जाणार नाही.

*A word file should be emailed to vrutta@bmmonline.org While sending email, please have the email Subject added as “Diwali Ank”

टीप: http://www.google.com/ transliterate या वेबसाईटवर मराठीमध्ये टाईप करता येते. नंतर ते Microsoft Word मध्ये copy करून, save करून किंवा email मध्ये copy करून vrutta@bmmonline.org ह्या address वर पाठवावे.

**जाहिराती आणि शुभेच्छा संदेश :** जाहिरातीचे दर:

Full Page: $400

Half Page: $250

Quarter Page: $125

BMM वृत्तात जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश देण्यासाठी व्संपर्क साधावा- email-Rajan.Pednekar@bmmonline.org; Vrutta@bmmonline.org

आपली मुद्रणसिध्द जाहिरात किंवा शुभेच्छा संदेश 'वृत्त दिवाळी अंक' साठी **सप्टेंबर ३०, २०२३** च्या आत मिळणे आवश्यक आहे.

### वृत्त दिवाळी अंकासाठी मदत करायची इच्छा आहे?

मॅगझीन वर काम करायचा पूर्वीचा अनुभव असल्यास आणि वृत्त दिवाळी अंकास मदत करण्याची इच्छा असल्यास संपर्क साधावा: Vrutta@Bmmonline.org

### Youth Corner: (age 5 to 18 years):

Vrutta team invites the second generation of Marathi American authors, poets and artists to contribute to the 'Youth Corner' section of ‘Vrutta Diwali Ank 2023’, our annual Diwali Magazine. Send your articles, stories written in English OR Marathi. You can also send your drawings and artwork.

**All youth articles should be submitted before September 15th 2023 to vrutta@bmmonline.org.** Your name, age and email address may be included with your submission. While sending email, please have the Subject added as “Diwali Ank”

**आभारी आहोत,**

**बीएमएम वृत्त टीम**

**NAMASKAR**

Charity giving to any entity in India is now easy with Foundation for Small Charities India, Inc. (FSCI) Granted by IRS A (501 (C)(3) Tax Exempt Status. An affiliate 'Foundation for Small Charity' (FSC) has the 80-G and FCRA required Registration in India, allowing you to give at will, without any red tape. India recipients of your giving need not be a registered charity. Your school or college never attempted to obtain tax exemption in India, which is very expensive.

We welcome repatriation of after-tax sales proceeds of realty by US Citizens of Indian origin. We will honor remittance of tuition fees by parents to colleges in the USA for their children from India.

**FSC is the answer.**
**Visit our Website "WWW.SmallCharity.Org", for more detail.**

**Or email to Admin@SmallCharity.Org .**

You will hear from Ramesh Sarva, CPA, 183 Broadway, #210, Hicksville NY 11801

## Join Donor List:

JAGDISH & SHUBHANGI THAKUR
RAVI & NILIMA BHIRUD
RAHUL & PUNAM MUTHA
KOTESWARA RAO KUNDA, MD
KIRAN& NNDINI JOAG
KISHOR DANDEKAR
SUBHASH & VASANTI PURANIK
SUHASINI JOSHI
KAMLAKAR &ARUNA PENDSE
PRAMILA SARVA
VIJAY NARINGREKAR
MUKUND & SHAILA DIDOLAKE
GOVIND & BHAKTI NADKARNI

SHARAD PANJAPE
KAMALAKAR PENDSE
SUHASINI JOSHI

SWAROOP YOG & OTHER CHARITIES
M. KARVE FONDN 16 NEW GIRLS EDU
ANAND RISHI Hosp. C T SCAN
EDUCATIONAL FOUNDATION, A.P.
V.T. PATIL FOUNDATION
AMPTE FOUNDATIO
CASP, V.S. SAMITHI, PUNE, PATHAK RST
KOSMIC BEATS
ATHASHREE
ADHAR
EDUCTION
AKKA DHOPESWAR MAHILA MANDAL
SHANTA DUEGA TEMPLE, KAVLEM, GOA
LD ENGG COLLEGE, LIBRARY REDEVALOPMENT
ATHASHREE, IMROVE FACILITIES FOR SENIORS
ATHASHREE
COSMIC BEATS

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

|| मराठी तितुका मेळवावा ||

**Subscription Remittance Address:**

**BMM Newsletter**
**20611 Whitebud CT.**
**Tampa FL 33647**


बृहन्महाराष्ट्र मंडळ



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

A BMM Matrimonial Initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/




Five-level "Marathi Language Learning"
progressive curriculum,
study guidelines, and
supporting materials
the BMM-Bharati Vidyapeeth's
joint certificates for
"Marathi Bhasha" examinations
after successful completion of
each level and passing criteria.
For BMM Marathi Shala Inquiries,
Email:- shala@bmmonline.org
https://bmmshala.net/

## BMM Outdoors

**सूचना: मागील अंकात खालील लेखाच्या शेवटी चुकीने लेखकाचे नाव प्रिंट झाले नव्हते, त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून हा लेख पुन्हा लेखकाच्या नावासोबत प्रदर्शित करत आहोत! - वृत्त संपादक मंडळ**

### फिटनेसोत्सव २०२३ – 5k For 5K

सप्टेंबर २०२२ मध्ये जेव्हा मी बीएमएम अध्यक्ष, श्री. संदीप दीक्षित यांच्याशी BMM Outdoors या उपक्रमाविषयी बोललो तेव्हा त्यांनी लगेचच यास पाठिंबा देऊन प्रसाद पानवलकर यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या BMM Outreach च्या अंतर्गत Outdoors चा ही समावेश करून घेतला. प्रसाद पानवलकर यांच्या सहकार्यामुळे आणि नंतर आम्हाबरोबर तितक्याच, किंबहुना कदाचित जरा अधिकच जोमाने मदत करणाऱ्या टोरोंटोच्या श्री. मिलिंद पाटील यांच्या उत्साहामुळे हा उपक्रम सुरू करायला अधिकच हुरूप आला. BMM Outdoors ला जे सहकार्य मिळाले तेच सहकार्य आणि संमती ५k फॉर ५K या माझ्या पहिल्या उपक्रमास ही मिळाले. हा कार्यक्रम म्हणजे नक्की काय? तर प्रत्येक बीएमएम सभासद मंडळाने महाराष्ट्र दिनानिम्मित २२ एप्रिल ते २९ मे या दरम्यान आपल्या स्थानिक ठिकाणी walkathons आयोजित करायचे. वॉकथॉन्स मध्ये कमीत कमी ५ की मी तरी प्रत्येकाने चालावे किंवा धावावे ही माफक अपेक्षा. अशा सर्व सभासद मंडळांनी आयोजित केलेल्या walkathons मधून सगळ्यांचे मिळून ५,००० किलोमीटर्स तरी जमावेत ही दुसरी माफक अपेक्षा. लोकहो, कळवण्यास अतिशय आनंद होत आहे की आत्तापर्यंत ९०० होऊन अधिक लोकांनी या कार्यक्रमात भाग घेऊन ५,७५० हून अधिक किलोमीटर पार केले आहेत.

अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर टोरोंटो मराठी मंडळाने ५k फॉर ५K या उपक्रमाचा श्रीगणेशा केला. टोरोंटोचेच श्री. मिलिंद पाटील यांच्या नेतृत्वाखाली मंडळाच्या बऱ्याच सभासदांनी आणि होतकरू सभासदांनी यात उत्साहाने भाग घेतला. दोन वेगवेगळ्या स्पर्धेत सहभागी होऊन ४० टोरोंटोवासीयांनी ४५१ किलोमीटर अंतर पार पाडले. टोरोंटोने श्रीगणेशा केलेल्या कार्यक्रमाची मे मधील सांगता न्यू जर्सीच्या मराठी विश्वने केली आणि याचवेळी आपण आपले ५००० किलोमीटर चे लक्ष्य गाठू शकलो, किंबहुना ते पार करून बरेच पुढे जाऊ शकलो.

अशा या सुंदर सुरुवातीनंतर पुढील मंडळांनी देखील या उपक्रमाला जबरदस्त हातभार लावला:

**उपक्रम नेतृत्व, मंडळ शहर/राज्य, #स्पर्धक -किलोमीटर्स:** नयना सहस्त्रबुद्धे - सिनसिनाटी, ओहायो १७ - ८८७; योगेश दाते - फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया ३५ - १७५; समीर श्रावगे - कॅलगरी, कॅनडा १७० - ९८६, ईस्ट बे एरिया, कॅलिफोर्निया ६६ - ३१४ ; मुकुंद आवटे - कनेटिकट १४० - ७००; विठ्ठल कुलकर्णी - सॅन अँटोनियो, टेक्सास ४७ - २३५; प्रसाद पानवलकर ऑस्टीन, टेक्सास ९१ - ४७५ ; मिलिंद पाठक - ओरलँडो ४८ - २४०; मंजुषा नाईक - साऊथ फ्लोरिडा ५५ - २७५; निरंजन देव, राजश्री कुलकर्णी, मिलिंद पुराणिक - मराठी विश्व, न्यू जर्सी ८०-६५५ ; प्रसाद अथणीकर - शिकागो मराठी मंडळ ८६- ४३०

**एकूण #स्पर्धक ९०८ किलोमीटर्स ५,८३३** काही विशेष उल्लेखनीय गोष्टी: Youngest 5k participant: 10 month old (Marathi Vishwa, NJ); Oldest 5k participant: 86 years (कनेटिकट महाराष्ट्र मंडळ, CTMM); Oldest 10k participant: 84 years (Marathi Vishwa, NJ)

सर्व Team लीड्स आणि co-leads चा मी मनापासून आभारी आहे. केवळ १० मंडळं एकत्र येऊन हे करू शकली - सर्व मंडळं जर हे walkathons आयोजित करू शकले तर यात नक्कीच २,००० हून अधिक लोक सहभागी होतील आणि आपण सर्व महाराष्ट्र दिनानिम्मित एकत्र येऊन १५,००० हून जास्ती किलोमीटर पार करून साजरा करू आपला फिटनेसोत्सव!



- निरंजन देव
मराठी विश्व, न्यू जर्सी; इव्हेंट लीड - BMM Outdoors

## जरा विसावू या वळणावर...

**सूचना: मागील अंकात खालील लेखासाठी नजर चुकीने लेखकाचे नाव चुकीचे प्रिंट झाले होते, त्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करून हा लेख लेखिकेच्या नावासकट पुन्हा येथे देत आहोत..**



एखाद्या संस्थेचा वर्धापन दिन म्हणजे अनेक लोकांसाठी घरचं कार्य! संस्थापक, स्वयंसेवक, हितचिंतक आणि अर्थातच रसिक प्रेक्षक या साऱ्यांसाठीच अत्यंत महत्वाचा सोहळा असतो. आमची "कला" म्हणजे बे एरियातील नाट्यप्रेमींची "कलेमधून, कलेसाठी!" हे ब्रीद सांभाळणारी, ललित कलांना वाहिलेली संस्था. कोव्हीडकाळातल्या नियम आणि मर्यादा सांभाळाव्या लागल्यामुळे, कलाने एकविसाव्या वर्षी- वाढत्या मापाने- वीस वर्षांचा वर्धापनदिन साजरा केला! २५ आणि २६ मार्च रोजी, अमाप उत्साहात, दर्जेदार कार्यक्रमांच्या मेजवानीसह वर्धापनदिन महोत्सव संपन्न झाला.

मान्यवर लेखक सतीश आळेकर यांनी प्रमुख पाहुणे म्हणून येण्याचं आमंत्रण स्वीकारलं आणि सोहळा "कला" ला साजेसा होणार याची मुहूर्तमेढ रोवली गेली. दोन दिवसांच्या या सोहोळ्याची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते तिसरी घंटा वाजवून झाली. आळेकर यांनी ती अशा उत्साहात आणि मन:पूर्वक वाजवली की त्या घंटेच्या निनादात पारंपारिक नांदीमधले भाव उमटल्याचा भास व्हावा- आणि मग पहिला कार्यक्रम सुरू झाला. "Director's Cut!" आजवर "कला" मध्ये अनेक नव्या-जुन्या दिग्दर्शकांनी नाटकं सादर केली आहेत. पण त्यातही काही दिग्दर्शक असे आहेत ज्यांनी केवळ दिग्दर्शित केलेल्या नाटकांच्या संख्येने नव्हे तर गुणवत्तेनेही आपला ठसा उमटवला आहे. अशा या जाणत्या आणि गुणी दिग्दर्शकांच्या मुलाखतींचा हा रंगतदार कार्यक्रम.

नंतर "शारदा ते चारचौघी" हा १८९९ - १९९१ या कालावधीतील मराठी नाटकातील प्रातिनिधिक स्त्रीव्यक्तिरेखांचा आढावा घेणारा कार्यक्रम सादर झाला. "कला" ची स्वतंत्र निर्मिती असलेला १७ महिलांच्या चमूने विलक्षण आत्मीयतेने आणि ताकदीने सादर केलेला हा अनोखा कार्यक्रम सर्व रसिकांची भरघोस दाद मिळवून गेला - आणि ध्यास घेऊन केलेल्या सर्व कष्टांचं फलित गवसल्यासारखं वाटलं! पहिल्या दिवसाची सांगता काव्यवाचनाने झाली. "कवितेवरील कविता" या कार्यक्रमात, कविता म्हणजे काय, ती कशी सुचते, घडते आणि वाढते कशी याचा प्रत्यय जुन्या-नव्या कवींच्या शब्दातून मिळवत पहिल्या दिवसाची काव्यमय सांगता झाली.

दुसऱ्या दिवशीचं वेळापत्रकही भरगच्च होते. यावेळी श्री. आळेकर यांनी "ठकीशी संवाद" या नव्या-कोऱ्या नाटकाचं वाचन केलं. खास त्यांच्या शैलीतली - अनेकपदरी, अर्थपूर्ण आणि कलात्मक संहिता आणि त्याचं अत्यंत परिणामकारक वाचन ही श्रोत्यांसाठी पर्वणीच होती! नाट्यवाचन नंतर चार एकांकिका सादर झाल्या. "अनुदिन अनुतापें", "तळ्यात-मळ्यात" आणि "लॉस्ट कनेक्शन" या तीन एकांकिका स्थानिक संघांच्या, तर "अल्पविराम" ही थिएट्रिक्स, न्यू जर्सी च्या निमंत्रित कलाकारांची एकांकिका. विषय, नेपथ्य, मांडणी त्यातील विविधता या एकांकिकांच्या प्रयोगातून अनुभवता आली.

आजवरच्या सर्व कार्यक्रमांची शीर्षकं असलेला प्रवेशद्वारावरील "कला"फलक , प्रेक्षकांसाठी अंथरलेलं "रेड कार्पेट" आणि दोन दिवस चाललेल्या कार्यक्रमांच्या अधेमध्ये पेरलेल्या गेल्या वीस वर्षातील प्रवासाचा आढावा घेणाऱ्या चित्रफिती यामुळे एक सुरेख माहौल तयार झाला होता. स्मरणरंजनाची ही हलकीशी रेषा "कला"चित्राचे सौंदर्य खुलवत होती.

या सोहळ्याची आखणी, मांडणी, नियोजन, सादरीकरण जवळून अनुभवल्यानंतर, कार्यक्रमपूर्तीनंतरचं अवलोकन ओघाने येतंच. अनुभवांच्या शिदोरीची भरभराट होताना नव्या संकेतांच्या खुणगाठी आपसूक बसतात. हौशी कलाकारांची संस्था असली तरी, कार्यक्रम निवडताना बसवताना आणि सादर करताना हौसे इतक्याच मोलाने दर्जा सांभाळला गेला पाहिजे यावर समितीचं नेहेमी एकमत होतं! (मराठी लोकांच्या समितीचं एकमत हे एक आश्चर्यच!). त्यानुसार गेल्या वीस वर्षात कार्यक्रम झाले. नाटक आणि एकांकिका प्राधान्याने सादर होतात. त्याचबरोबर समीप रंगमंच, नाट्यवाचन, संगीत, कविता, ऑडिओ बुक, "कला" टीव्ही, शॉर्ट फिल्म, मान्यवरांच्या मुलाखती, नाट्यशिबिरं असे वेगवेगळे कार्यक्रम "कला" तर्फे गेल्या वीस वर्षात सादर झाले आहेत.

"कला" या नावाला अनुसरून आणि स्मरून या सगळ्या कार्यक्रमात विविधता आणि नवं काही साकारण्याची उमेद असते. "कला" ही स्वयंसेवकांची संस्था आहे. वीस वर्षात यामध्ये अनेक नवे "कला"कार सहभागी झाले आहेत- ज्यांना "कला" ही आपली संस्था वाटते. हमखास यशस्वी होणारे पठडीतले कार्यक्रम न करता नवी आव्हानं स्वीकारायची, तालमी करताना तडजोड करायची नाही, सादरीकरणात कलात्मक जबाबदारी स्वीकारायची आणि सर्वतोपरी निभवायची, वैचारिक जाणिवा विस्तारायच्या ही "कला" ची मूल्यं त्यांना पटतात आणि भावतात ही मोठी जमेची बाजू आहे!

सर्वांनी मिळून आजवर जे यश मिळवलंय ते टिकवता कसं येईल, ज्या चुका घडल्या त्या टाळता कशा येतील, नवी क्षितीजं काय असावीत, आपल्या या संस्थेची उत्तरोत्तर प्रगती कशी होईल या विचारांनी "कला" सतत वृद्धिंगत होत आहे.

वीस वर्षांच्या प्रवासात "कला" ने यशापयश अनुभवलंय. खूप शिकायला मिळालंय आणि म्हणूनच या थांब्यावर क्षणभर विसावून सुखावताना सर्व "कला"कारांच्या मनात पुढच्या भरारीची उत्फुल्ल उमेदही आहे!

**- हेमांगी वाडेकर**